# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग. जि. रायगड. पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in


अत्यंत तातडीचे

विषयः- वनजमीन रायगड.
नागोठणे सब स्टेशन ते वडखळ (डोलवी) 220 के. व्ही. डी. सी. ट्रान्समिशन लाईन टाकणेचा महाराष्ट्र राज्य विद्युत ट्रान्समिशन कं. लि. यांचा प्रस्ताव. क्षेत्र 1.8947 हेक्टर.

जावक क्र. ब/20/जमीन/ 3343 /2017-18.
अलिबाग 402 201. दिनांकः- 16 /11/2017.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
इएचव्ही कन्स्ट्रक्शन डिव्हीजन,
एमएसइटीसीएल, कळवा, ठाणे

संदर्भः- 1) केंद्रशासनाचे पत्र क्र. एफसी-I/एमएच-18/2015-एनजीपी/40,दि 20/1/16.
2) केंद्रशासनाचे पत्र क्र. एफसी-I/एमएच-18/2015-एनजीपी/1383 दि 20/2/17
3) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमीन/453 दिनांक 03/05/2017.
4) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-17/(RS-II)/नोडल/12414/(58)/714 दि. 17/06/2017.
5) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमीन/1632 दिनांक 07/07/2017.
6) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-17/(RS-II)/नोडल/12414/(58)/1702 दि. 24/10/2017.
7) या कार्यालयाचे पत्र क्र. ब/20/जमीन/3192 दिनांक 07/11/2017.
8) आपले पत्र क्र. EE/EHV. P. Dn/ KLW/Tech/ 1073 दिनांक 09/11/2017.

नागोठणे सब स्टेशन ते वडखळ (डोलवी) 220 के. व्ही. डी. सी. ट्रान्समिशन लाईन टाकणेचा महाराष्ट्र राज्य विद्युत ट्रान्समिशन कं. लि. यांचा वन जमिन मागणीचा प्रस्ताव क्षेत्र 1.8947 हेक्टर यास केंद्रशासनाने वरील संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये तत्वतः मंजुरी प्रदान केली आहे.

सदर प्रस्तावामध्ये केंद्रशासनाने त्यांचे संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये काही मुद्दयांबाबत पुर्तता करणेसाठी कळविले आहे. त्याअनुषंगाने पूर्तता करणेबाबत आपणास या कार्यालयाकडून तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांनी त्यांचे संदर्भीय पत्रान्वये फेर विचारणा करणेत आलेली आहे.

त्याअनुषंगाने आपण संदर्भीय पत्र क्र. 8 अन्वये पुर्तता अहवाल या कार्यालयात दाखल केले आहे. सदर पुर्तता अहवालानुसार अहवाल वरीष्ठ कार्यालयात सादर करणेची कार्यवाही यथावकाश करण्यांत येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी कळविणेत येत आहे की, अवनत वनक्षेत्रावर वनीकरण योजना राबविणेसाठी आपणाकडून सन 2016-17 या आर्थिक वर्षासाठी रक्कम रु. 451385/- प्रती हेक्टरी याप्रमाणे 3.7894 हे. साठी रक्कम रु. 17,10,478/- व 0.50 हेक्टरवर दंडात्मक वनीकरणासाठी आपण रक्कम रु. 2,25,693/- भरणा केलेली आहे. तथापी सदर प्रस्तावांस अदयापपर्यंत अंतिम मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे पर्यायी वनीकरण योजना राबविणे शक्य झालेली नाही. त्यामुळे सदर योजना ही सन 2017-18 नंतरच राबविणे शक्य होणार आहे.

सद्यस्थितीत सन 2017-18 या आर्थिक वर्षासाठी प्रति हेक्टरी रक्कम रु. 4,96,523/- असा दर असून त्याप्रमाणे 3.7894 हेक्टर पर्यायी वनीकरण व 0.50 हेक्टर दंडात्मक पर्यायी वनीकरण असे एकूण 4.2894 हेक्टर साठी एकूण रक्कम रु. 21,29,786/- एवढा भरणा करणे आवश्यक आहे. सदर रक्कमेपैकी आपण रु. 19,36,171/- एवढया रकमेचा भरणा केलेला आहे. तरी फरकाची एकूण रक्कम **रु. 1,93,615/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख त्र्याण्णव हजार सहाशे पंधरा)** मात्र चा भरणा, ऑनलाईन प्रणालीवरुन चलन जनरेट करुन करणेस विनंती आहे.

सदर रक्कम भरणा केलेनंतर एकत्रीत पुर्तता अहवाल वरीष्ठ कार्यालयात सादर करणे शक्य होणार असल्याने त्याप्रमाणे तातडीने कार्यवाही करावी.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, अलिबाग यांचकडे माहिती व वनक्षेत्रपाल यांचेकडून पूर्तता करुन अहवाल त्यांचे अभिप्रायासह या कार्यालयात सादर करणेसाठी रवाना.

प्रतः- वनक्षेत्रपाल नागोठणे व वनक्षेत्रपाल सुधागड यांचेकडे माहिती व उचित कार्यवाहीसाठी रवाना.

2/- त्यांनी केंद्रशासनाचे संदर्भीय पत्र क्र. 3 मधील त्रुटी क्र. (ii), (iii) व (iv) प्रमाणे तात्काळ पुर्तता करुन अहवाल सहा. वनसंरक्षक, अलिबाग यांचे मार्फत या कार्यालयत सादर करावा.

प्रतः- वनक्षेत्र सर्व्हेक्षक, अलिबाग यांचेकडे माहितीसाठी व वनक्षेत्रपाल यांना आवश्यकतेनुसार जरुरी मदत उपलब्ध करुन देणेसाठी रवाना.